दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. २८ एप्रिल, २०२६ | वर्ष - १ | अंक - २१३ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, वैशाख मास, शुक्लपक्ष, द्वादशी संध्याकाळी ६-५२ पर्यंत नंतर त्रयोदशी तिथी दिवस नक्षत्र – उत्तरा रात्री १०-३६ पर्यंत नंतर हस्त चंद्र रास- कन्या, सूर्य रास - मेष, गुरु रास - मिथुन

### अटकपूर्व जामीन नाकारला

**मुंबई:** नागपूरमधील एसबीएल एनर्जी लिमिटेडच्या दारूगोळा निर्मिती युनिटमध्ये झालेल्या स्फोटाप्रकरणी, मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी कंपनीच्या पाच वरिष्ठ अधिकाऱ्यांचा अटकपूर्व जामीन फेटाळला. नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती रजनीश व्यास यांनी पाचही आरोपींविरुद्ध गुन्हा सिद्ध होत असल्याचे नमूद केले आणि संजय चौधरी, आलोक चौधरी, आलोक अवधिया आणि श्रवण कुमार, आणि केदार पाचपुत्रे यांचा अटकपूर्व जामीन नाकारला.

## सारांश वृत्त

### पंजाबमध्ये नैसर्गिक वायूचे साठे?

**चंदीगड :** पंजाबचे खाणकाम आणि भूविज्ञान मंत्री बरिंदर कुमार गोयल यांनी सोमवारी सांगितले की, पोटॅशचे साठे सापडल्यानंतर राज्य आता नैसर्गिक वायू आणि तेल साठ्यांच्या शोधाच्या दिशेने वाटचाल करत आहे. एका पत्रकानुसार, सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयांतर्गत येणाऱ्या हायड्रोकार्बन महासंचालक आणि ऑइल इंडिया लिमिटेडच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी येथे पंजाबच्या खाणकाम आणि भूविज्ञान मंत्र्यांची भेट घेतल्यानंतर ही टिप्पणी करण्यात आली.

### पंजाबमधील आमदार मान यांच्या पाठीशी

**चंदीगड :** पंजाब आम आदमी पक्षाचे कार्याध्यक्ष बुध राम यांनी सोमवारी ठामपणे सांगितले की, पक्षाचे सर्व आमदार मुख्यमंत्री भगवंत मान यांच्यासोबत खंबीरपणे उभे आहेत, तसेच राज्यातील अनेक आमदार राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांच्या संपर्कात असल्याचा दावाही त्यांनी फेटाळून लावला. आनंदपूर साहिबचे 'आप' लोकसभा खासदार, मालविंदर सिंग कांग यांनीही असेच मत व्यक्त केले की, पक्षाचे आमदार मुख्यमंत्र्यांसोबत आहेत.

### वंदे भारत पुण्यात रुळावरून घसरली

**पुणे :** सोमवारी संध्याकाळी मुंबई-सोलापूर वंदे भारत एक्सप्रेस पुणे रेल्वे स्थानकात प्रवेश करण्यापूर्वी तिचा एक डबा रुळावरून घसरला, मात्र या घटनेत कोणताही प्रवासी जखमी झाला नाही, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते सोलापूरला जाणारी प्रीमियम एसी ट्रेन सायंकाळी ७.३० च्या सुमारास एका प्लॅटफॉर्मजवळील क्रॉसिंगवरून जात असताना ही घटना घडली.

### परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांचे संकेत; सरकारच्या निर्णयाकडे लक्ष

# मराठी सक्तीला मुदतवाढ मिळणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी अनिवार्य करण्याच्या निर्णयाबाबत राज्य सरकारने सध्या एक पाऊल मागे घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी रिक्षा-टॅक्सी संघटनांच्या प्रतिनिधींशी झालेल्या बैठकीनंतर याबाबत संकेत दिले.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुनील तटकरे यांनी याबाबत भूमिका मांडली आहे. त्यांना या निर्णयाचं स्वागत केलं आहे."मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे. इथे येणाऱ्या प्रत्येकाने इथल्या संस्कृतीचा आणि भाषेचा आदर केलाच पाहिजे. रिक्षा-टॅक्सीचालक हा प्रवाशांशी थेट जोडलेला असतो, त्यामुळे त्याला मराठी येणे हे प्रवाशांच्या सोयीचेही आहे. यासंदर्भात टप्प्याटप्प्याने मराठीच्या सक्तीची अंमलबजावणी करायला हरकत नाही. दुसऱ्या बाजूला मराठी प्रवाशांनीही प्रवास करताना जाणीवपूर्वक मराठी भाषेचा वापर करावा", असं आवाहन सुनील तटकरे यांनी केलं आहे.

१ मेपासून अमराठी चालकांसाठी 'व्यावहारिक मराठी' अनिवार्य करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला होता. मात्र, या निर्णयावर विविध संघटनांनी आक्षेप घेत मराठी शिकण्यासाठी काही महिन्यांची मुदत देण्याची मागणी केली. याच पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीत सरकारने आपली भूमिका थोडी मवाळ केल्याचे दिसून आले. बैठकीत "मराठी कितपत यायला हवी?" असा प्रश्न संघटनांकडून उपस्थित करण्यात आला. त्यावर "जुजबी, व्यवहारातील मराठी येणे आवश्यक आहे," असे सरकारने स्पष्ट केले. प्रवाशांशी साधा संवाद, कुठे जायचे, भाडे किती झाले, एवढ्या पातळीवर मराठी येणे अपेक्षित असल्याचे सांगण्यात आले.

संघटनांनी ६ महिने ते १ वर्ष इतकी मुदत मागितली असून, काही संघटनांनी अमराठी चालकांना मराठी शिकवण्याची जबाबदारीही स्वीकारण्याची तयारी दर्शवली. "रोजीरोटीवर गदा येऊ नये," ही संघटनांची भूमिका ठाम होती. त्यावर सरकारनेही "कोणाच्याही पोटावर पाय आणायचा नाही," असे स्पष्ट केले. मात्र, मुदतवाढीबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. आरटीओ अधिकाऱ्यांसोबत आणखी एक बैठक घेऊन त्यानंतरच अंतिम निर्णय जाहीर केला जाईल, असे सरनाईक यांनी सांगितले. "मुदत देऊ शकतो, पण मुजोरी चालणार नाही," असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, मराठी सक्तीचा निर्णय पूर्णपणे मागे घेतलेला नसून त्याच्या अंमलबजावणीसाठी काहीसा अवधी दिला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे सरकारचा अंतिम निर्णय काय होतो, याकडे राज्यातील रिक्षा-टॅक्सी चालकांचे लक्ष लागले आहे.

# जातीवाचक शब्दप्रयोग वाद; ममता बॅनर्जी यांना नोटीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात २३ एप्रिल रोजी मोठ्या प्रमाणावर मतदान झाले असून सुमारे ९२ टक्क्यांहून अधिक मतदानाची नोंद झाली आहे. त्याचवेळी, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना प्रचारसभेत केलेल्या जातीवाचक वक्तव्यावरून राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने नोटीस बजावली आहे.

निवडणूक प्रचारादरम्यान एका सभेत बोलताना ममता बॅनर्जी यांनी वापरलेल्या शब्दप्रयोगावरून वाद निर्माण झाला आहे. त्यांच्या वक्तव्यामुळे अनुसूचित जाती समाजाचा अपमान झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची दखल घेत राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने राज्य सरकारला नोटीस पाठवली आहे.

आयोगाचे अध्यक्ष किशोर मकवाना यांनी म्हटले आहे की, संबंधित शब्दप्रयोग हा अनुसूचित जाती समुदायासाठी अपमानास्पद मानला जातो. हे वक्तव्य केवळ आक्षेपार्ह नसून अनुसूचित जाती व जमाती कायद्यातील कलम ३(१)(s) अंतर्गत दंडनीय ठरू शकते. या प्रकरणात आयोगाने पश्चिम बंगालचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक यांनाही नोटीस बजावली असून, तीन दिवसांच्या आत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. "अनुसूचित जाती-जमातींच्या सन्मानाचे रक्षण करणे ही आमची जबाबदारी आहे. कोणत्याही परिस्थितीत जातीय अपमान सहन केला जाणार नाही," असे त्यांनी स्पष्ट केले. अनुसूचित जातींवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ झाल्याच्या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री पदावरील व्यक्तीकडून अशा प्रकारचा शब्दप्रयोग होणे दुर्दैवी असल्याचे मानले जात आहे.

# चौंडी परिसराच्या विकासाचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अहिल्यानगर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मस्थळ असलेल्या चौंडी (ता. जामखेड) परिसराचा सर्वसमावेशक आणि नियोजनबद्ध विकास करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. पर्यटनाला चालना देण्यासाठी दर्जेदार सुविधा उभारण्यावर भर देण्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मुंबईत सोमवारी झालेल्या बैठकीत चौंडी येथील स्मृतिस्थळाच्या जतन, संवर्धन आणि विकास आराखड्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीला विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांनी यावेळी काही महत्त्वाचे निर्देश दिले. बुडीत बंधाऱ्यांऐवजी 'बॅरेज' उभारण्याच्या प्रस्तावाबाबत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यास सांगण्यात आले. मंदिर परिसरातील आवश्यक भूसंपादन जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून करण्याचे निर्देशही देण्यात आले. तसेच, बुडीत बंधाऱ्यांऐवजी 'बॅरेज' उभारण्याबाबत प्रत्यक्षस्थळ पाहणी करावी. मंदिर परिसरातील भूसंपादन जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून करावे. प्रकल्पातील काही सुविधा उभारणी व देखभालीसाठी खासगी भागीदारी (पीपीपी मॉडेल) आणण्याबाबत सकारात्मक विचार सुरू असून, यामुळे पर्यटन सुविधा अधिक दर्जेदार, टिकाऊ पद्धतीने विकसित करता येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यामुळे पर्यटन सुविधा अधिक दर्जेदार, टिकाऊ आणि आधुनिक पद्धतीने विकसित करता येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमध्ये सुसूत्रता आणि पारदर्शकता आणण्यासाठी निर्णय

# विधिमंडळाच्या सुरक्षा यंत्रणेत मोठे बदल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** विधिमंडळातील प्रलंबित प्रश्नांचा जलद निपटारा आणि विधानभवनाची सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी सोमवारी सुरक्षा यंत्रणेत बदल करण्याचे निर्देश दिले.

यानुसार, प्रत्येक अधिवेशनात ३३ टक्के सुरक्षा कर्मचारी चक्राकार पद्धतीने (रोटेशन) बदलले जाणार आहेत. या निर्णयामुळे सुरक्षा व्यवस्थेत पारदर्शकता आणि सतर्कता वाढेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

विधानमंडळ सचिवालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत सभापतींनी कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी संसदीय आयुधांचा पुनरावृत्तीने होणारा वापर टाळण्यासाठी कठोर नियमावली लागू करण्याचे निर्देश दिले. सभागृहात उपस्थित प्रश्नांचे निराकरण निश्चित कालमर्यादेत होणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. अतारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना, औचित्याचे मुद्दे आणि मंत्र्यांच्या आश्वासनांची प्रलंबितता तातडीने दूर करण्यासाठी प्रशासनाला आदेश देण्यात आले आहेत. मंत्रालयीन विभागांकडून होणारा विलंब टाळण्यासाठी नव्या पाठपुरावा प्रणालीची अंमलबजावणी होणार आहे. सुरुवातीला संबंधित विभागाच्या सचिव आणि मंत्र्यांच्या खासगी सचिवांना पत्र पाठवले जाईल; त्यानंतरही कार्यवाही न झाल्यास संबंधित मंत्री आणि राज्याच्या मुख्य सचिवांना थेट स्मरणपत्र पाठवले जाईल. मंत्रालय आणि विधानभवन यांच्यातील समन्वयासाठी असलेला 'डॅशबोर्ड' सातत्याने अद्ययावत ठेवण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

सुरक्षेच्या दृष्टीने प्रवेशपत्र वितरण प्रक्रिया अधिक काटेकोर करण्यात येणार असून, पोलीस महासंचालकांशी समन्वय साधून सुरक्षा यंत्रणेतील बदल राबवले जातील. या उपाययोजनांमुळे हितसंबंध निर्माण होण्याची शक्यता कमी होऊन यंत्रणेची कार्यक्षमता वाढेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या बैठकीला विधानमंडळ सचिवालयाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### सुसूत्रता आणि पारदर्शकता आणण्यासाठी निर्णय

# आरोग्य विभागाचे सर्वसमावेशक बदली धोरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमध्ये सुसूत्रता आणि पारदर्शकता आणण्यासाठी शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या पाठपुराव्यानंतर गट-ब, गट-क आणि गट-ड कर्मचाऱ्यांसाठी सर्वसमावेशक बदली धोरण लागू करण्यात आले आहे.

१५ एप्रिल २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी एकसंध आणि स्पष्ट धोरण निश्चित करण्यात आले आहे. याआधीचे विविध आदेश आणि परिपत्रके रद्द करून एकत्रित धोरण लागू करण्यात आले आहे.

नवीन धोरणानुसार, बदल्या प्रामुख्याने समुपदेशन पद्धतीने करण्यात येणार आहेत. यात सेवा कालावधी, प्राधान्यक्रम, पसंतीक्रम आणि प्रशासकीय गरज यांचा समतोल साधला जाणार आहे. दरवर्षी एप्रिल-मे महिन्यात सर्वसाधारण बदल्या होतील, तर विनंती बदल्या सप्टेंबर आणि डिसेंबरमध्ये विचारात घेतल्या जातील. एका कार्यालयातील एकूण कर्मचाऱ्यांच्या ३० टक्क्यांपेक्षा अधिक बदल्या एकाच वेळी होणार नाहीत, अशी महत्त्वाची अट ठेवण्यात आली आहे. दुर्गम व अडचणीच्या भागात दीर्घकाळ सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुलभ ठिकाणी बदली देण्यास प्राधान्य दिले जाईल. तसेच रिक्त पदांचा समतोल राखण्यावरही भर दिला जाणार आहे. धोरणात मानवी आणि सामाजिक बाबींनाही महत्त्व देण्यात आले आहे. अपंग कर्मचारी, गंभीर आजारांनी ग्रस्त व्यक्ती, विधवा महिला, पती-पत्नी एकत्रीकरण आणि शैक्षणिक कारणे या बाबींना प्राधान्यक्रम देण्यात आला आहे.

बदली प्रक्रिया पूर्णतः प्रशासकीय ठेवण्यात येणार असून कोणत्याही प्रकारचा राजकीय किंवा बाह्य दबाव आणल्यास शिस्तभंगाची कारवाई केली जाईल. रिक्त पद उपलब्ध नसताना केलेली बदली अनियमित मानली जाईल आणि संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली जाईल. या सर्वसमावेशक धोरणामुळे सार्वजनिक आरोग्य विभागातील मनुष्यबळ व्यवस्थापन अधिक पारदर्शक, गतिमान आणि परिणामकारक होण्यास मदत होणार आहे.

### मंगळुरू बॉम्ब प्रकरणी कारावासाची शिक्षा

**बंगळूर :** येथील एका विशेष एनआयए न्यायालयाने सोमवारी मंगळुरू बॉम्ब प्रकरणातील मुख्य आरोपीला १० वर्षांच्या सक्त कारावासाची शिक्षा सुनावली आणि ९४,००० रुपयांचा दंड ठोठावला. मोहम्मद शारिकने या प्रकरणात आपण निर्दोष असल्याचा दावा केला होता, परंतु नंतर डिसेंबर २०२५ मध्ये त्याने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २२९ अंतर्गत गुन्हा कबूल केला, जो विशेष न्यायालयाने स्वीकारला. शारिक एका ऑटोरिक्षातून प्रेशर कुकर आयईडी घेऊन जात होता. हिंदू समाजात दहशत पसरवण्यासाठी मंगळूरच्या काद्री मंजुनाथ मंदिरात तो ठेवण्याची त्याची योजना होती.

# अमेरिकेची चर्चेसाठी 'विनवणी'

### इराणने रशियात दाखल होताच केला दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तेहरान/मॉस्को :** निर्बंध आणि दबाव कायम असतानाही अमेरिका चर्चेसाठी पुढाकार घेत असल्याचा दावा इराणने केला आहे. इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अरागची यांनी म्हटले की, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांचे प्रशासन चर्चेसाठी प्रयत्न करत आहेत, आणि तेहरान या प्रस्तावावर विचार करत आहे.

सोमवारी रशियात दाखल झाल्यानंतर अरागची यांनी सांगितले की, अमेरिकेला आपली उद्दिष्टे साध्य करता आलेली नाहीत. "रशियाचा पाठिंबा मिळाल्यानंतर अमेरिकेवर दबाव वाढला असून त्यामुळेच चर्चेची भाषा सुरू झाली आहे," असे ते म्हणाले. मध्यपूर्वेतील तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता चर्चेच्या पुढील फेरीबाबत अजूनही अनिश्चितता आहे. मात्र दोन्ही बाजूंनी संवादाचे संकेत दिल्याने राजनैतिक हालचालींना वेग आला आहे.

ओमान आणि पाकिस्तानचा दौरा आटोपल्यानंतर अरागची सेंट पीटर्सबर्ग येथे पोहोचले, जिथे त्यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांची भेट घेतली. या भेटीत पुतीन यांनी इराणच्या भूमिकेचे कौतुक करत "सार्वभौमत्वासाठी इराणने धैर्याने लढा दिला आहे," असे म्हटले. तसेच आखाती प्रदेशात शांतता प्रस्थापित करण्यासाठी रशिया इराणसह इतर देशांच्या हितासाठी प्रयत्न करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या घडामोडींमुळे मध्यपूर्वेतील तणाव, जागतिक ऊर्जा बाजार आणि आंतरराष्ट्रीय राजकारणावर परिणाम होण्याची शक्यता आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील संबंध काहीसे मवाळ होण्याची चिन्हे दिसत असली तरी प्रत्यक्ष तोडगा अजूनही दूर असल्याचे स्पष्ट झाले आहे. इराणने अमेरिकेला नवा प्रस्तावही सादर केला आहे.

### सार्वजनिक आरोग्य विभागाचा इशारा

# उष्णतेचा कहर; उष्माघात ही वैद्यकीय आणीबाणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील अनेक भागात प्रचंड उष्णतेची लाट कायम असून तापमानात सातत्याने वाढ होत आहे. कडक उन्हामुळे नागरिक आजारी पडण्याच्या घटनांत वाढ होत असल्याने सार्वजनिक आरोग्य विभागाने 'उष्माघात ही वैद्यकीय आणीबाणी' असल्याचा इशारा दिला आहे.




उष्णतेच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने 'मेडिकल ॲडव्हायझरी' जारी करत नागरिकांना आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. तहान लागली नसली तरी नियमित पाणी पिणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे. प्रवास करताना पिण्याचे पाणी सोबत ठेवावे, तसेच ओआरएस, लिंबूपाणी, ताक, लस्सी यांसारख्या द्रवपदार्थांचे सेवन करावे. फळांचा रस घेताना त्यात थोडे मीठ घालण्याचा सल्लाही देण्यात आला आहे. टरबूज, खरबूज, संत्री, द्राक्षे, अननस, काकडी यांसारखी पाण्याचे प्रमाण जास्त असलेली फळे आणि भाज्या आहारात समाविष्ट कराव्यात.

कपड्यांबाबतही विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. हलके, सैल आणि सुती कपडे, शक्यतो फिकट रंगाचे वापरावेत. बाहेर जाताना डोके झाकून ठेवावे आणि थेट उन्हात जाताना छत्री किंवा टॉवेलचा वापर करावा. पायात बूट किंवा चप्पल घालणेही आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे. लहान मुले, वृद्ध, घराबाहेर काम करणारे कामगार, हृदयविकार आणि उच्च रक्तदाब असलेले रुग्ण, गर्भवती महिला आणि मानसिक आजार असलेल्या व्यक्तींना उष्माघाताचा अधिक धोका असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

घरातही काही खबरदारी घेणे आवश्यक आहे. एकटे राहणाऱ्या वृद्ध आणि आजारी व्यक्तींवर लक्ष ठेवावे. घर थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर किंवा सनशेड वापरावेत. रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात, तर दिवसा शक्यतो खालच्या मजल्यावर राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. शरीर थंड ठेवण्यासाठी पंखे, ओले कापड, स्प्रे बाटल्या किंवा बर्फाचा वापर करावा. तसेच, सुमारे २० अंश सेल्सिअस तापमानाच्या पाण्यात पाय बुडवून ठेवल्यास शरीराला लवकर थंडावा मिळू शकतो.

उष्माघाताची लक्षणेही गंभीर असल्याचे सांगण्यात आले आहे. शरीराचे तापमान ४० अंश सेल्सिअस (१०४ फॅरेनहाइट) पर्यंत वाढणे, गरम व कोरडी त्वचा, तीव्र डोकेदुखी, चक्कर येणे, बेशुद्ध पडणे, मळमळ, उलट्या, श्वास घेण्यास त्रास, हृदयाचे वेगाने ठोके, लघवीचे प्रमाण कमी होणे, तोंड कोरडे पडणे, सुस्ती, चिडचिडेपणा ही प्रमुख लक्षणे आहेत. गंभीर अवस्थेत रुग्णाला झटके येणे किंवा कोमात जाण्याची शक्यता असल्याचा इशाराही देण्यात आला आहे. उष्णतेच्या वाढत्या तीव्रतेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आवश्यक ती काळजी घेणे अत्यावश्यक असून कोणतीही लक्षणे दिसल्यास तातडीने वैद्यकीय मदत घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

# पुणे रेल्वे स्थानकाचा विस्तार; ६ नवीन प्लॅटफॉर्मना मंजुरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** शहरातील वाढती प्रवासी गर्दी आणि रेल्वे वाहतुकीवरील ताण लक्षात घेता पुणे रेल्वे स्थानकाच्या मोठ्या विस्ताराला मंजुरी देण्यात आली असून, स्थानकावर ६ नवीन प्लॅटफॉर्म उभारले जाणार आहेत. या निर्णयामुळे पुणे स्थानकाची क्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.

रेल्वे प्रशासनाने सुमारे ३९८ कोटी रुपयांच्या खर्चातून यार्ड रिमॉडेलिंगसह हा प्रकल्प हाती घेतला आहे. या अंतर्गत केवळ नवीन प्लॅटफॉर्मच नव्हे, तर विद्यमान प्लॅटफॉर्मचा विस्तार, नवीन प्रवेश-निर्गमन मार्ग, तसेच आधुनिक प्रवासी सुविधा उभारल्या जाणार आहेत.

सध्या पुणे स्थानकावर मर्यादित प्लॅटफॉर्ममुळे नवीन गाड्या सुरू करण्यास अडचणी येत होत्या. त्यामुळे अतिरिक्त ६ प्लॅटफॉर्म उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. या विस्तारामुळे भविष्यात अधिक रेल्वे गाड्या सुरू करणे शक्य होणार आहे, तसेच प्रवाशांची गर्दी कमी होण्यास मदत होईल. काम टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असून, पहिल्या टप्प्यात काही नवीन प्लॅटफॉर्मचे बांधकाम सुरू झाले आहे. उर्वरित काम पुढील टप्प्यांत पूर्ण केले जाणार आहे. संपूर्ण प्रकल्प पूर्ण होण्यासाठी सुमारे एक वर्षाचा कालावधी अपेक्षित असल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. हडपसर आणि खडकी रेल्वे स्थानकांचाही विकास केला जात असून, काही गाड्यांचे मार्गांतर करून पुणे स्थानकावरील ताण कमी करण्याची योजना आहे. नवीन प्लॅटफॉर्म, सुधारित पायाभूत सुविधमुळे पुणे रेल्वे स्थानकाचे आधुनिकीकरण होणार आहे.

## संपादकीय

# सुकाळातील 'दुष्काळ' आणि सुधारणांचे वाळवंट




**भारतीय शेतीपुढचे यंदाचे वर्ष हे केवळ निसर्गाच्या लहरीपणाचे नसून धोरणात्मक दिवाळखोरीचेही ठरणार आहे. टंचाईच्या या सावटात सुधारणांची 'पेरणी' करण्याचे धाडस सरकार दाखवणार की केवळ तात्पुरत्या मलमपट्टीत समाधान मानणार, हा खरा कळीचा प्रश्न आहे.**

भारतीय राजकारणात 'शेती' हा शब्द निवडणुकीच्या भाषणात जितका सुपीक वाटतो, तितकाच तो धोरणांच्या अंमलबजावणीत वाळवंटी ठरलेला आहे. आगामी कृषी वर्षाबाबतचा टंचाईचा इशारा आणि त्यातून निर्माण झालेली सुधारणांची संधी याकडे पाहिले तर, भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आजही 'मान्सून' आणि 'मंत्रालयातील फाईल्स' यांच्यात कसा अडकला आहे, याची प्रचिती येते. आपण चंद्रावर पाऊल ठेवण्याच्या गप्पा मारतो खरे, पण जमिनीवरच्या पिकाला बाजारात भाव मिळवून देण्यासाठी आजही आपण अठराव्या शतकातील 'बंदी' आणि 'सवलती' यांच्याच चक्रव्यूहात अडकलो आहोत. यंदाचे कृषी वर्ष हे अत्यंत विचित्र वळणावर उभे आहे. एका बाजूला हवामान बदलाचा तडाखा आणि दुसऱ्या बाजूला सरकारी गोदामांमधील रिकामी होत जाणारी पोती. गहू आणि तांदूळ या दोन्ही प्रमुख पिकांचा 'बफर स्टॉक' गेल्या अनेक वर्षांतील नीचांकी पातळीवर पोहोचला आहे. निसर्गाच्या लहरीपणावर कोणाचे नियंत्रण नसते हे मान्य, पण निसर्गाच्या या लहरीपणाचा सामना करण्यासाठी जी 'धोरणात्मक सज्जता' हवी होती, तिथेच आपली खरी मेख आहे. जेव्हा जेव्हा टंचाई जाणवते, तेव्हा सरकारचा पहिला आणि आवडता उपाय म्हणजे 'निर्यात बंदी'. कांदा असो वा तांदूळ, जागतिक बाजारपेठेत भारताची विश्वासार्हता पणाला लावून आपण देशांतर्गत किमती नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतो. भारतीय शेतीपुढील सर्वात मोठे अरिष्ट म्हणजे 'पोथीनिष्ठ' राजकारण. पंजाब आणि हरियाणातील गव्हाच्या आणि तांदळाच्या अतिउत्पादनाने तिथली जमिनीखालची पाण्याची पातळी रसातळाला नेली आहे, हे सर्वांना ठाऊक आहे. पण, 'एमएसपी'च्या दावणीला बांधलेली आपली शेती व्यवस्था यातून बाहेर पडायला तयार नाही. पिकांच्या विविधीकरणाच्या गप्पा वर्षानुवर्षे सुरू आहेत, पण प्रत्यक्ष जमिनीवर आजही तांदूळच राजा आहे, कारण तिथे सरकारी खरेदीची हमी आहे. जोपर्यंत आपण शेतीला 'मुक्त बाजारपेठे'चा वारा लागू देत नाही, तोपर्यंत शेतकरी हा उद्योजक न बनता केवळ अनुदानावर जगणारा 'अन्नदाता' राहील. आणि जोपर्यंत तो केवळ 'अन्नदाता' आहे, तोपर्यंत तो राजकीय पक्षांसाठी केवळ 'मतदाता' आहे. 'सुधारणांसाठी सुकाळ' असे जेव्हा म्हटले जाते, तेव्हा त्याचा अर्थ असा की, संकट हे नेहमीच बदलाची संधी घेऊन येते. १९९१ चे आर्थिक संकट नसते तर भारताने उदारीकरणाचा स्वीकार केला नसता. आज शेती क्षेत्रात नेमकी तशीच परिस्थिती आहे. खतांवरील अवाढव्य सबसिडी, मोफत वीज आणि सिंचनाचा अभाव या त्रिसूत्रीने शेतीचा गळा आवळला आहे. सुधारणा करायच्या असतील तर आपल्याला या लोकप्रिय घोषणांच्या पलीकडे जाऊन विचार करावा लागेल. जागतिक स्तरावर 'अन्न सुरक्षा' हा केवळ भुकेचा प्रश्न राहिलेला नाही, तर तो सामरिक शक्तीचा भाग बनला आहे. रशिया-युक्रेन युद्धाने जगाला हे दाखवून दिले आहे की, ज्याच्याकडे अन्नधान्य आहे, तो जगाला वेठीस धरू शकतो. भारत हा जगाचा 'ब्रेडबास्केट' होऊ शकतो, पण त्यासाठी आपल्या शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची आणि जागतिक व्यापार नीतीची जोड हवी. येत्या हंगामात गव्हाच्या उत्पादनात घट होण्याची चिन्हे आहेत, तर तांदळाच्या साठ्याबाबतची चिंता वाढली आहे. अशा वेळी सरकार पुन्हा एकदा 'अँटी-होर्डिंग' कायद्यांचा बडगा उगारण्याची शक्यता आहे. हे कायदे म्हणजे 'इन्स्पेक्टर राज'चे पुनरागमन आहे. व्यापाऱ्यांना आणि साठवणूक करणाऱ्या कंपन्यांना गुन्हेगार ठरवून आपण गुंतवणुकीलाच विरोध करत असतो. जर साठवणुकीची सोय नसेल, तर बंपर पीक आल्यावर शेतकऱ्याचे काय हाल होतात, हे आपण दरवर्षी कांदा आणि टोमॅटोच्या बाबतीत पाहतो. सुधारणा करायच्या असतील तर आपल्याला साठवणूक आणि प्रक्रिया उद्योगांना मोकळे रान द्यावे लागेल. निसर्ग बदलत आहे, जग बदलत आहे, पण आपली कृषी धोरणे आजही त्याच जुन्या 'कंट्रोल' आणि 'सबसिडी'च्या चौकटीत अडकली आहेत. यंदाच्या या 'टंचाईच्या हंगामात' जर आपण धोरणात्मक सुधारणांची पेरणी केली नाही, तर पुढच्या वर्षीचा सुकाळही आपल्याला तारू शकणार नाही. कारण सुधारणा या गरजेतून नाही, तर त्या 'विवेकातून' यायला हव्या असतात. टंचाईचा हा इशारा म्हणजे सरकारसाठी शेवटची संधी आहे; एकतर सुधारणा करा किंवा पुन्हा एकदा जागतिक बाजारातून महागडे धान्य आयात करून 'श्रीमंत देशातले गरीब शेतकरी' म्हणून मिरवा.

# सागराचा 'गहरा' पेच आणि धोरणात्मक धुकं

**» जागतिक जलमार्गांवर ओढवलेले संकट भारताच्या सामरिक नौकानयनातील उणिवा उघड करणारे ठरत आहे. विशाल समुद्रकिनारा लाभणे म्हणजे सागरी महासत्ता होणे नव्हे, हे या अरिष्टाने पुन्हा एकदा कठोरपणे सांगितले आहे.**



जगाच्या अर्थकारणाची नाडी आजही निळ्या सागराच्या लाटांवर धडधडत असते, हे विसरण्याचे धाडस कोणालाही महागात पडू शकते. विशेषतः जेव्हा तांबडा समुद्र किंवा होर्मुझची समुद्रधुनी यांसारख्या मोक्याच्या जलमार्गांवर भू-राजकीय तणावाचे सावट येते, तेव्हा जागतिक पुरवठा साखळीचे धागे किती विरविरीत आहेत, याची प्रचिती येते. सध्याचे जागतिक नौकानयन संकट हे केवळ अपघाती नाही, तर ते भारताच्या सागरी रणनीतीमधील गंभीर पोकळी उघड करणारे आहे. आपण 'मेक इन इंडिया'च्या गप्पा मारतो खरे, पण ज्या जहाजांतून हा माल जगाच्या बाजारात पोहोचणार आहे, त्या जहाजांच्या ताफ्यावर आपले नियंत्रण किती? या प्रश्नाचे उत्तर शोधताना आपली धोरणात्मक हतबलता स्पष्टपणे समोर येते.

भारताला ७,५०० किलोमीटरहून अधिक लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे, हे भूगोल सांगतो. पण अर्थशास्त्र सांगते की, या किनाऱ्याचा वापर करून जागतिक व्यापारात आपला वाटा किती? आजही भारताच्या विदेशी व्यापारापैकी तब्बल ९० ते ९५ टक्के वहन हे परकीय कंपन्यांच्या जहाजांतून होते. हे म्हणजे स्वतःचे घर असूनही सामानाची ने-आण करण्यासाठी शेजाऱ्याच्या बैलगाडीवर अवलंबून राहण्यासारखे आहे. जेव्हा जागतिक संकट येते, तेव्हा या परकीय कंपन्या आधी स्वतःच्या देशाचे हित पाहतात किंवा भाड्याचे दर गगनाला भिडवतात. अशा वेळी भारतीय निर्यातदारांना 'परकीयांचे मिंधी' होऊन राहण्याशिवाय दुसरा पर्याय उरत नाही. भारताच्या सागरी धोरणातील हा सर्वात मोठा 'स्ट्रक्चरल' दोष आहे.

येथे कळीचा मुद्दा आहे तो म्हणजे 'लॉजिस्टिक्स'चा अवाढव्य खर्च. भारतामध्ये मालाची ने-आण करण्याचा खर्च हा जीडीपीच्या १४ ते १६ टक्के आहे, तर विकसित देशांमध्ये हाच आकडा ८ ते १० टक्क्यांच्या आसपास असतो. या तफावतीचे मुख्य कारण म्हणजे आपल्या बंदरांची अपुरी क्षमता आणि तिथल्या संथ प्रक्रिया. जगातील मोठी जहाजे भारताच्या किनाऱ्याला लागण्याऐवजी कोलंबो, सिंगापूर किंवा दुबईच्या बंदरांवर थांबणे पसंत करतात. तिथून मग लहान जहाजांच्या मदतीने माल भारतात आणला जातो. याला तांत्रिक भाषेत 'ट्रान्सशिपमेंट' म्हणतात. भारताकडे आजही स्वतःचे असे जागतिक दर्जाचे 'ट्रान्सशिपमेंट हब' नाही, ही धोरणात्मक टाळाटाळ आपल्याला दरवर्षी अब्जावधी डॉलर्सच्या तोट्यात ढकलत आहे.

सागरी सामर्थ्याचा विचार करताना केवळ 'नौदल' प्रबळ असून चालत नाही, तर 'व्यापारी नौदल' तितकेच सक्षम असावे लागते. भारताकडे स्वतःच्या मालकीची पुरेशी जहाजे का नाहीत? याचे उत्तर आपल्या नोकरशाहीच्या लाल फितीत आणि कररचनेत दडलेले आहे. भारतीय ध्वज लावून जहाज चालवणे हे करदृष्ट्या इतके महागडे आहे की, भारतीय कंपन्याही आपली जहाजे पनामा किंवा लायबेरियाच्या ध्वजाखाली नोंदवणे पसंत करतात. हा केवळ महसुलाचा तोटा नाही, तर तो 'राष्ट्रीय सुरक्षे'चाही प्रश्न आहे. युद्धजन्य परिस्थितीत जर परकीय जहाजांनी भारतात येण्यास नकार दिला, तर आपली जीवनवाहिनीच खंडित होऊ शकते.

चीनने गेल्या दोन दशकांत ज्या प्रकारे आपली सागरी शक्ती वाढवली, त्याकडे आपण 'असूयेने' पाहतो खरे; पण त्यांच्या धोरणांमधील सातत्य आपण शिकत नाही.

चीनने केवळ बंदरे बांधली नाहीत, तर त्यांनी जहाजे बांधण्याचे केंद्र म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली. आज जगातील ४० टक्क्यांहून अधिक जहाजे चीनमध्ये बांधली जातात, तर भारताचा वाटा १ टक्क्यापेक्षाही कमी आहे. 'आत्मनिर्भरता' केवळ घोषणांमध्ये राहते.

'सागरमाला' सारख्या प्रकल्पांनी सुरुवात तर केली आहे, पण त्यांचा वेग कासवाचा आहे आणि समोरची आव्हाने सशाच्या वेगाने धावणारी आहेत. आपल्याला केवळ बंदरे आधुनिक करून चालणार नाही, तर जहाज बांधणीसाठी सवलती द्याव्या लागतील आणि भारतीय जहाजांना प्राधान्य देणारे कायदे करावे लागतील. सागराचे पाणी हे अथांग असते आणि त्यात बुडण्याची भीती नेहमीच असते. पण ज्याला वाऱ्याची दिशा कळते आणि ज्याच्याकडे मजबूत सुकाणू असते, तोच समुद्र पार करू शकतो.

भारताने जर आताच आपल्या सागरी धोरणातील ही चूक दुरुस्त केली नाही, तर भविष्यातील जागतिक आर्थिक वादळांत आपली अर्थव्यवस्था हेलकावे खात राहील. 'ब्लू इकॉनॉमी' हे केवळ मृगजळ राहू नये, असे वाटत असेल, तर दिल्लीच्या मंत्रालयांना जमिनीवरून नजर काढून समुद्राच्या खोल वास्तवाकडे वळावे लागेल. अन्यथा, सागराचा हा 'गहरा' पेच आपल्या विकासाच्या मार्गातली मोठी धोरणात्मक दरी ठरेल.

# उपसूचना प्रकरणी विभागप्रमुखांना जबाबदार धरा

## प्रवीण जैन यांचे दक्षता विभागाला पत्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** महापालिकेच्या अर्थसंकल्पातील उपसूचना प्रकरणात बिले तयार करण्याची अंतिम जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांवरच असते, त्यामुळे त्यांनाच जबाबदार धरणे आवश्यक आहे, असे स्पष्ट मत सक्तीच्या रजेवर असलेले मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनी दक्षता विभागाला दिलेल्या पत्रात मांडले आहे.



अर्थसंकल्पात नवीन कामांचा समावेश, प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, तरतुदींचे नियोजन, तसेच निधी संपल्यास स्थायी समिती किंवा महापालिका सभेकडे विषयपत्र सादर करणे ही संपूर्ण प्रक्रिया नियमांनुसार पार पडणे आवश्यक असते. या प्रक्रियेनंतरच कामांची बिले तयार केली जातात. या प्रक्रियेत कनिष्ठ अभियंता, उपअभियंता, उपलेखापाल, लेखापाल, लेखाधिकारी, कार्यकारी अभियंता, सहशहर अभियंता आणि शहर अभियंता यांची जबाबदारी निश्चित असते, असेही जैन यांनी नमूद केले आहे.

दरम्यान, १४ बोगस उपसूचनांच्या माध्यमातून सुमारे ६० कोटी रुपयांची बिले ३० मार्चच्या रात्री ठेकेदारांना अदा करण्यात आल्याचा आरोप असून, या प्रकरणाने शहरात खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर प्रवीण जैन यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. तसेच चौकशी समितीने प्राथमिक अहवाल आयुक्तांकडे सादर केला असून, जैन यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी महापौर रवि लांडगे आणि स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी केली आहे.

जैन यांनी १७ एप्रिल रोजी दिलेल्या पत्रात स्पष्ट केले आहे की, सर्व मंजुरी प्रक्रिया पूर्ण झाल्याची खात्री करूनच विभागप्रमुखांनी बिलांवर स्वाक्षरी करणे बंधनकारक आहे. उपसूचना मान्य नसल्यास बिले तयार करणे अपेक्षित नव्हते. जर बिले तयार झाली नसती, तर ती लेखा विभागाकडे सादर झालीच नसती, असेही त्यांनी नमूद केले आहे. तसेच, २४ मार्च रोजी झालेल्या अर्थसंकल्पीय विशेष सभेच्या अनुषंगाने या उपसूचना लेखा विभागाकडे सादर करण्यात आल्या होत्या. त्या २०२५-२६ च्या सुधारित अर्थसंकल्पातील तरतुदींच्या वाढ-घट संदर्भातील असल्याने आर्थिक वर्षअखेर ३१ मार्चपूर्वी बिले देणे आवश्यक होते, असेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.

# पवना धरणातील पाणीसाठा ३९ टक्क्यांवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहराची तहान भागवणाऱ्या पवना धरणातील पाणीसाठा सध्या ३९ टक्क्यांवर आला आहे. तीव्र उन्हामुळे होणारे बाष्पीभवन आणि वाढती पाण्याची मागणी यामुळे साठा झपाट्याने घटत असल्याचे चित्र आहे. उपलब्ध पाणीसाठा जूनअखेरपर्यंत, पुरेल, असा अंदाज महापालिका अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

मावळ तालुक्यातील पवनानगर येथील पवना धरणातून पिंपरी-चिंचवड शहरासह ३० लाखांहून अधिक लोकसंख्येला पाणीपुरवठा केला जातो. महापालिकेकडून रावेत येथील बंधाऱ्यातून दररोज सुमारे ५२० एमएलडी पाणी उचलले जाते. त्यावर प्रक्रिया करून ते पिण्यायोग्य स्वरूपात शहरभर वितरित केले जाते. याशिवाय, एमआयडीसीकडून दररोज ३० एमएलडी पाणी घेतले जाते. आंद्रा धरण पाणी योजनेअंतर्गत निघोजे येथील बंधाऱ्यातून सुमारे ९० एमएलडी पाणी उचलून चिखली जलशुद्धीकरण केंद्रातून प्रक्रिया करून संबंधित भागात पुरवठा केला जात आहे. सध्या शहरात गेल्या साडेसहा वर्षांपासून दोन दिवसांतून एकदा पाणीपुरवठा केला जात आहे. पवना धरणातील साठा शहरासोबत एमआयडीसी, काही नगरपालिका आणि ग्रामपंचायतींच्या गरजाही भागवतो. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन प्रशासनाने नागरिकांना केले आहे.

# पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेची तयारी सूरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पावसाळ्यात उद्भवणाऱ्या संभाव्य नैसर्गिक आपत्तींचा सामना करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने नियंत्रण आणि नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. क्षेत्रीय कार्यालय स्तरावर उपआयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांना नोडल अधिकारी, तर अतिरिक्त आयुक्तांना नियंत्रण अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या स्वाक्षरीने याबाबत आदेश जारी करण्यात आले आहेत.

पावसाळ्यात शहरात पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन नागरिकांना तातडीची मदत मिळावी आणि आपत्कालीन परिस्थिती प्रभावीपणे हाताळता यावी, यासाठी ही नियुक्ती करण्यात आली आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील मालमत्तांचे संरक्षण आणि नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करणे, हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे. नोडल अधिकाऱ्यांना पावसाळ्यापूर्वी नाल्यांची साफसफाईसारखी कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागांशी समन्वय साधण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या पूरनियंत्रण आराखड्यानुसार स्थापत्य, पाणीपुरवठा, आरोग्य, अग्निशमन, वैद्यकीय आणि विद्युत विभागांशी समन्वय ठेवून आपत्कालीन सेवा सुरळीत ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# माता रमाई आंबेडकर सृष्टीचे आज भूमिपूजन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या स्मरणार्थ उभारण्यात येणाऱ्या भव्य 'माता रमाई आंबेडकर सृष्टी' प्रकल्पाचे भूमिपूजन मंगळवार, २८ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. पिंपरी येथील भीमसृष्टी परिसरात महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते हा कार्यक्रम पार पडणार आहे.



या सोहळ्याला केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार अध्यक्षस्थानी असतील. तसेच विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, खासदार सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे, डॉ. अमोल कोल्हे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ. भीमराव आंबेडकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. कार्यक्रमानिमित्त सुप्रसिद्ध लोकगायक आनंद शिंदे यांचे गीतगायन आणि 'मी रमाई' या एकपात्री नाट्यप्रयोगाचेही आयोजन करण्यात आले आहे.

पिंपरी चौकातील सुमारे २४९८.९७ चौरस मीटर जागेवर उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पासाठी २४ महिन्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. सृष्टीमध्ये मजबूत आरसीसी बांधकाम, आकर्षक म्युरल्स, जीआरसी काम, माता रमाई यांच्या पुतळ्यासाठी सुबक चौथरा, प्रतीक्षालय आणि स्वतंत्र जिने अशी सुविधा असणार आहे. याशिवाय परिसराचे सौंदर्य वाढविण्यासाठी भव्य प्रवेशद्वार, पादचारी मार्ग, लँडस्केप गार्डन, कारंजे आणि आधुनिक रोषणाईची व्यवस्था केली जाणार आहे. नागरिकांसाठी स्वच्छतागृह, दिव्यांगांसाठी रॅम्प व लिफ्ट तसेच बसण्याची सोय उपलब्ध करून दिली जाईल. तंत्रज्ञानाचाही वापर या सृष्टीत करण्यात येणार असून क्यूआर कोडच्या माध्यमातून माता रमाई आंबेडकर यांच्या जीवनकार्याची माहिती मिळेल. बहुभाषिक ऑडिओ प्रणालीमुळे नागरिकांना अधिक समृद्ध अनुभव घेता येणार आहे. या ऐतिहासिक भूमिपूजन सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

# अंमली पदार्थांविरोधात कारवाई; 'राजस्थान कनेक्शन' उघड

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** शहरातील अंमली पदार्थांच्या वाढत्या विळख्यावर नियंत्रण आणण्यासाठी पुणे पोलिसांनी मोठी मोहीम राबवत सुमारे ४८ लाख ६६ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत 'राजस्थान कनेक्शन' समोर आल्याने प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे.

पोलीस आयुक्तांच्या आदेशानुसार ८ एप्रिल ते २३ एप्रिल दरम्यान परिमंडळ ७ मध्ये विशेष मोहीम राबवण्यात आली. वाघोली, लोणीकंद, लोहेगाव विमानतळ परिसर, चंदननगर आणि खराडी या वर्दळीच्या तसेच आयटी हब भागांत छापे टाकण्यात आले. या कारवाईत एम.डी. (मेफेड्रॉन) आणि गांजाची विक्री तसेच सेवन करणाऱ्यांविरोधात एनडीपीएस कायद्यांतर्गत एकूण १३ गुन्हे दाखल करण्यात आले असून ११ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

अटक केलेल्या आरोपींच्या चौकशीत काही जण थेट राजस्थानमधून एम.डी. महाराष्ट्रात आणत असल्याची माहिती समोर आली. त्यानुसार पोलिसांनी तपासाचा विस्तार करत राजस्थानपर्यंत धाडसी पावले उचलली आहेत. कारवाईदरम्यान २६८.११ ग्रॅम एम.डी., ४८२ ग्रॅम गांजा आणि २६० ग्रॅम एम.डी. मिश्रित पावडर असा एकूण सुमारे ४८.६६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या मोहिमेमुळे शहरातील अंमली पदार्थ विक्रेत्यांना मोठा धक्का बसला असून नागरिकांनी ड्रग्जविषयी कोणतीही माहिती मिळाल्यास तात्काळ पोलिसांना कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पोलिसांना धक्काबुक्की; चौघांविरुद्ध गुन्हा

**पुणे :** पाषाण येथील संजय गांधी वसाहतीत वाद सोडवण्यासाठी गेलेल्या पोलीस हवालदाराला धक्काबुक्की केल्याप्रकरणी एका महिलेसह चौघांविरुद्ध चतुःश्रृंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चतुःश्रृंगी पोलीस ठाण्यातील हवालदार शरद होनमाने हे सहकाऱ्यांसह २४ एप्रिल रोजी रात्री सुमारे अकराच्या सुमारास गस्त घालत होते. त्यावेळी संजय गांधी वसाहतीत काही व्यक्तींमध्ये वाद सुरू असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आणि कायदेशीर कारवाईसाठी होनमाने पुढे सरसावले.

दरम्यान, पोलिसांकडून कारवाई सुरू असताना संबंधितांनी हुज्जत घालत पोलिसांनाच विरोध केला. वाद चिघळताच आरोपींनी होनमाने आणि त्यांच्या सहकाऱ्यांशी धक्काबुक्की केली. शासकीय कामात अडथळा निर्माण करत पोलिसांवर हात उचलल्याने काही काळ परिसरात तणाव निर्माण झाला. या प्रकरणी शरद होनमाने यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चौघांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक येळे करत आहेत.

दरम्यान, गेल्या काही दिवसांत पोलिसांवर हल्ल्याच्या घटना वाढल्याचे दिसत आहे. या पार्श्वभूमीवर शासकीय कर्मचाऱ्यांवर हल्ला करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

### आयएलएस लॉ कॉलेजमध्ये रॅगिंग

**पुणे :** आयएलएस लॉ कॉलेज आणि त्याच्या मुलांच्या वसतिगृहात राहणाऱ्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्याला त्रास देत रॅगिंग केल्याप्रकरणी डेक्कन पोलिसांनी पाच विद्यार्थ्यांविरुद्ध महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, फिर्यादी विद्यार्थी एलएलबी द्वितीय वर्षात शिकत असून लॉ कॉलेज रोडवरील वसतिगृहात वास्तव्यास आहे. त्याच वसतिगृहातील पाच विद्यार्थ्यांनी त्याला शिवीगाळ करत मानसिक त्रास दिल्याची तक्रार करण्यात आली आहे. या त्रासामुळे संबंधित विद्यार्थ्याने काही महिन्यांपूर्वी डेक्कन पोलिसांकडे लेखी तक्रार दिली होती. महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३ आणि ४ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# पिंपरी मंडईत फळभाज्यांचे दर स्थिर; पालेभाज्यांत वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** येथील लालबहादूर शास्त्री मंडईत रविवारी फळभाज्यांचे दर मागील आठवड्याप्रमाणे स्थिर राहिले, तर पालेभाज्यांच्या दरात वाढ झाल्याचे दिसून आले. बाजारात वाघाट्या भाजीची आवक सुरू झाली असून सध्या तिचा दर १६० रुपये किलो आहे. उन्हामुळे आवळ्यांना मागणी वाढली आहे.

पालेभाज्यांमध्ये कोथिंबीर आणि मेथीची जुडी ३० रुपयांना विकली जात आहे. गवार आणि शेवगा ५० ते ६० रुपये किलो दराने उपलब्ध आहेत. वांगी आणि फ्लॉवर ४० ते ५० रुपये किलो दराने विक्री होत आहेत. मिरची ६० रुपये, कर्नाटक कैरी ५० ते ६० रुपये किलो दराने विकली जात आहे. कांदे पाच किलोसाठी १०० रुपये दराने मिळत असून लसूण १०० ते १५० रुपये आणि आले ६० ते ८० रुपये किलो दराने विकले जात आहे.

रविवारी मंडईतील इतर फळभाज्यांचे दर पुढीलप्रमाणे होते : गवार ७० रुपये किलो, शेवगा ४० रुपये, टोमॅटो २५ रुपये, भेंडी ५० रुपये, फ्लॉवर ४० रुपये, कोबी ३० रुपये, मिरची ५० रुपये, गाजर २५ रुपये, शिमला मिरची ६० रुपये, लसूण १०० ते १२० रुपये, आले ६० रुपये, वांगी ३० रुपये, काकडी ३० रुपये, कारले ७० रुपये, कांदे २० ते २५ रुपये किलो, बटाटा २५ ते ३० रुपये किलो, बिन्स ६० रुपये, पावटा ७० रुपये, लाल भोपळा ३० रुपये, घोसाळी ६० रुपये, दोडका ७० रुपये, तोंडली ७० रुपये.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### मजूर देण्याच्या बहाण्याने फसवणूक

**दौंड :** मजूर पुरवण्याचे आमिष दाखवून वाटलुज (ता. दौंड) येथील एका शेतकऱ्याची तब्बल ७ लाख ४५ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. गळीत हंगाम सुरू होऊनही मजूर न पाठवल्याने अखेर या प्रकरणी दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अजिनाथ नामदेव लंबाते (वय ५४, रा. वाटलुज) असे फसवणूक झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. तर प्रकाश हजारी राठोड (रा. मोरदंड तांडा, जि. धुळे) असे आरोपी मुकादमाचे नाव आहे. लंबाते यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, राठोड याने मजूर उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देत वेळोवेळी पैसे घेतले. मात्र प्रत्यक्षात गळीत हंगाम सुरू होऊनही मजूर न पाठवता टाळाटाळ केली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर लंबाते यांनी पोलिसांकडे धाव घेतली. या प्रकरणी दौंड पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला असून तपास सुरू आहे.

### उरुळी देवाचीत दिवसा घरफोडी

**फुरसुंगी :** उरुळी देवाची (ता. हवेली) परिसरात दिवसाढवळ्या घरफोडीची धक्कादायक घटना समोर आली आहे. अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून सुमारे ६ लाख ४ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांच्या गस्त व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या प्रकरणी राहुल रणधीर फुगटे (वय ५२, रा. मंतरवाडी, उरुळी देवाची) यांनी फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घरातील तिजोरी उघडण्यासाठी धारदार साधनाचा वापर केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. दिवसाढवळ्या घडलेल्या या घरफोडीमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली असून परिसरात पोलीस गस्त वाढवण्याची मागणी होत आहे. पुढील तपास सुरू आहे.

### ६ हजार कोटींच्या कर्जाला राज्य सरकारची थकहमी

# पुरंदर विमानतळासाठी भूसंपादनाला गती

दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुणे जिल्ह्यातील पुरंदर येथे प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी भूसंपादन प्रक्रियेला गती देण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक निधी उभारणीसाठी ६ हजार कोटी रुपयांच्या कर्जाला थकहमी देण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे जमीन संपादनाच्या मोबदल्याबाबत निर्णय घेण्याचा मार्ग मोकळा झाला असून, प्रभावित शेतकऱ्यांना लवकरच पैसे मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या विमानतळासाठी सुमारे ३ हजार एकर जमीन संपादित करण्यात येणार आहे. यासाठी यापूर्वीच १० फेब्रुवारी रोजी राज्य सरकारने कर्ज उभारणीस मान्यता दिली होती. आता या कर्जासाठी औपचारिक थकहमी दिल्यामुळे निधी उभारणीची प्रक्रिया वेगाने पूर्ण होणार आहे. या प्रकल्पासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, शहर व औद्योगिक विकास महामंडळ आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने एक विशेष उद्देश कंपनी स्थापन करण्यात येणार आहे.

जिल्हा प्रशासनाकडून जमीन संपादन करून ती एमआयडीसी कडे सुपूर्त केली जाणार आहे. कर्ज उभारणीसाठी एमआयडीसीला हुडको किंवा इतर वित्तीय संस्थांकडून निधी घेण्यास परवानगी देण्यात आली आहे.

राज्य सरकारची ही थकहमी एक वर्षासाठी वैध राहणार आहे. त्यामुळे या कालावधीत कर्ज उभारून भूसंपादनासाठी निधी वितरित करणे आवश्यक ठरणार आहे.

विशेष कंपनीकडून कर्जफेड करण्यात अडचण आल्यास राज्य सरकारकडून ती जबाबदारी उचलली जाणार आहे. या निर्णयामुळे प्रलंबित असलेल्या भूसंपादन प्रक्रियेला गती मिळणार असून, प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी हा टप्पा निर्णायक मानला जात आहे.

## प्लास्टिक दरवाढीचा कांदा उत्पादकांना फटका

दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर कांदा सुरक्षित ठेवण्यासाठी शेतकरी प्लास्टिक कागदाची खरेदी करत आहेत. मात्र, आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडी आणि आखातातील युद्धजन्य परिस्थितीमुळे प्लास्टिकच्या दरात सुमारे २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे आधीच अडचणीत असलेल्या कांदा उत्पादकांच्या खर्चात आणखी भर पडली आहे.

कांदा झाकण्यासाठी वापरला जाणारा प्लास्टिक कागद प्रतिकिलो १३० रुपयांवरून थेट १७० रुपयांपर्यंत वाढला आहे. तसेच कांदा साठवण्यासाठी लागणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांचे दरही १०-१२ रुपयांवरून २२ ते २४ रुपयांपर्यंत वाढले आहेत. पावसापासून कांदा वाचवण्यासाठी या साहित्याचा वापर अपरिहार्य असल्याने शेतकऱ्यांना वाढीव दराने खरेदी करावी लागत आहे. बाजारात कांद्याला केवळ १० ते १२ रुपये प्रतिकिलो इतकाच भाव मिळत आहे. उत्पादन आणि काढणीचा खर्चच जवळपास १० ते ११ रुपये प्रति किलो येत असल्याने शेतकऱ्यांना नफा मिळण्याऐवजी तोटा सहन करावा लागत आहे.

वाढलेला उत्पादन खर्च आणि कमी बाजारभाव यामुळे कांदा शेती आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याचे चित्र आहे. प्लास्टिक साहित्याच्या दरवाढीमुळे हा ताण आणखी वाढला असून अनेक शेतकरी आर्थिक कोंडीत सापडले आहेत. कांद्याला सध्या अत्यल्प दर मिळत असल्याने उत्पादन खर्चही निघत नाही. त्यात प्लास्टिक कागद आणि पिशव्यांचे दर वाढल्याने तोटा अधिक वाढला आहे.

व्यापाऱ्यांच्या मते, आंतरराष्ट्रीय बाजारात प्लास्टिकच्या कच्च्या मालाच्या दरात वाढ झाल्याने स्थानिक बाजारातही दर वाढले आहेत. मागणी वाढली असली तरी वाढलेल्या किमतींचा थेट फटका शेतकरी आणि ग्राहक दोघांनाही बसत आहे.

## घोड नदीत मुलांचा जल्लोष



दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** गेल्या चार-पाच दिवसांपासून वाढलेल्या प्रचंड उष्णतेमुळे आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील नागरिक हैराण झाले आहेत. दुपारच्या वेळी उकाड्याची तीव्रता इतकी वाढते की घराबाहेर पडणेही कठीण झाले आहे. या वाढत्या तापमानाचा त्रास लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांनाच सहन करावा लागत आहे.

विशेषतः दुपारच्या वेळेत उष्णतेपासून दिलासा मिळवण्यासाठी तरुण व लहान मुले विहिरी, नदीपात्र आणि तळ्यांकडे वळताना दिसत आहेत. पारगाव परिसरातील घोड नदी पात्रात दररोज दुपारी सुमारे २० ते २५ मुले एकत्र येऊन पोहण्याचा आनंद घेताना दिसत आहेत. या मुलांमध्ये पोहण्याची विशेष उत्सुकता दिसून येत असून काही मुले एकमेकांना पोटाला ड्रम किंवा प्लास्टिकच्या बाटल्या बांधून पोहण्याचे धडे देताना दिसतात. ग्रामीण भागातील साध्या व पारंपरिक पद्धतीने मुले पोहायला शिकत असल्याचे चित्र येथे पाहायला मिळत आहे.

सध्या घोड नदी पात्रात मुबलक पाणी उपलब्ध असल्यामुळे पोहण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे दुपारच्या कडाक्याच्या उन्हातही नदीकाठावर मुलांची गर्दी होत आहे. उकाड्याच्या झळा कमी करण्यासाठी हा पर्याय असल्याने मुलांचा ओढा दिवसेंदिवस वाढत आहे.

## चैतन्य विद्यालयाला विशेष प्राविण्य

दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** ग्राम विकास मंडळ, ओतूर संचलित चैतन्य विद्यालय, ओतूर यांना शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियान २०२५-२६ अंतर्गत विशेष प्राविण्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा सन्मान गुरुवार, दि. २३ एप्रिल रोजी पुणे येथील गणेश कला क्रीडा रंगमंच येथे झालेल्या पारितोषिक वितरण समारंभात प्रदान करण्यात आला.



महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक महेश पालकर, उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे तसेच पुणे जिल्हा माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भाऊसाहेब कारेकर यांच्या हस्ते विद्यालयाचा गौरव करण्यात आला, अशी माहिती मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.

पुणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग व पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियान राबविले जाते. या अभियानांतर्गत शाळांची भौतिक सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता, शासकीय योजनांची अंमलबजावणी, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, विविध उपक्रमांची अंमलबजावणी तसेच शिक्षकांचे योगदान या बाबींचे मूल्यमापन केले जाते. चैतन्य विद्यालयाने सलग दोन वर्षे या अभियानात उल्लेखनीय कामगिरी करत जिल्हास्तरावर सातत्य राखले आहे. त्यामुळे यंदा विद्यालयास विशेष प्राविण्य पुरस्काराने गौरविण्यात आले. या समारंभाला महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे सचिव नंदकुमार सागर, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव शिवाजी कामथे, ग्राम विकास मंडळ ओतूरचे सचिव प्रदीप गाढवे, पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष पंकज घोलप, मुख्याध्यापिका राजश्री भालेकर, भाऊसाहेब खाडे, अजित डांगे आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यालयास मिळालेल्या या सन्मानाबद्दल ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे, प्रभाकर तांबे, राजेंद्र डुंबरे, रघुनाथ तांबे, प्रदीप गाढवे, पंकज घोलप, राजश्री भालेकर, संजय हिरे, अनिल उकिरडे यांनी शिक्षकांचे अभिनंदन केले. तसेच पालकवर्गातूनही विद्यालयाचे कौतुक व्यक्त करण्यात येत आहे.

## लग्नसराईमुळे कापड दुकानांत गर्दी



दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** उन्हाळ्याच्या शालेय सुट्ट्या आणि लग्न तिथींच्या पार्श्वभूमीवर खेड तालुक्यात लग्नसराईला वेग आला असून राजगुरुनगर शहरातील कापड दुकानांत ग्राहकांची मोठी गर्दी होत आहे. वधू-वरांसाठी शालू, पोशाख तसेच कुटुंबीय व नातेवाईकांसाठी कपडे खरेदीसाठी नागरिक मोठ्या प्रमाणात बाजारपेठेकडे वळत आहेत.

लग्नपूर्व कार्यक्रमांची रेलचेलही वाढली आहे. गंध, साखरपुडा, मांडव डहाळे, केळवण, हळदी दळण अशा विविध विधींमुळे घराघरांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. हे कार्यक्रम घरात, गावातील मंदिरात किंवा मंगल कार्यालयात आयोजित केले जात असून जेवणावळींचे बेतही आखले जात आहेत.

याशिवाय वाजंत्री, डीजे, मंगल कार्यालयांचे बुकिंग यासाठी दोन्ही कुटुंबांची धावपळ सुरू आहे. लग्नसोहळे आणि रात्रीच्या वरातींमुळे शहरासह ग्रामीण भागातही आनंद, जल्लोष आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. लग्नानंतर पूजा, जागरण-गोंधळ आणि कुलदैवताचे दर्शन अशा धार्मिक कार्यक्रमांमुळेही लग्नघरांमध्ये चैतन्याचे वातावरण आहे.


दिवाळीनंतर कापड खरेदीसह पोशाख शिवण्यासाठी मोठी गर्दी होते. नवरदेवासाठी तयार आणि मापाप्रमाणे शिवले जाणारे पोशाख, फेटे, शूज यासह सर्व साहित्य एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिले जाते. पुढील दोन महिने लग्नतिथी असल्याने पोशाखांसाठी आगाऊ नोंदणीही वाढली आहे, असे स्वप्नील ढोरे, नवरंग कलेक्शन, राजगुरुनगर यांनी सांगितले.

## बिबट्याची चाहुल लागताच सायरन वाजू लागणार

दैनिक राज्य लोकतंत्र

**शिरूर :** तालुक्यातील करंदी परिसरात वाढत्या बिबट्या वावरामुळे निर्माण झालेल्या भीतीच्या पार्श्वभूमीवर वनविभागाने तातडीची उपाययोजना केली आहे. ग्रामस्थ आणि पोलिस पाटील वंदना साबळे यांच्या पाठपुराव्यामुळे गावात कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'बेस अलार्म सिस्टम' बसवण्यात आली आहे. या यंत्रणेमुळे आता परिसरात बिबट्या आढळताच त्वरित सायरन वाजून नागरिकांना सतर्क केले जाणार आहे.

गेल्या काही दिवसांत करंदी परिसरात बिबट्याचे वारंवार दर्शन होत होते. अनेक वेळा बिबट्याने पशुधनावर हल्ले केले असून, काही ठिकाणी तो घरांच्या आसपास आणि गोठ्यांजवळ फिरताना दिसून आला. या घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यांतही



कैद झाल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. विशेषतः शेतकरी, मजूर आणि शाळकरी मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला होता. ग्रामस्थांनी वनविभागाकडे अत्याधुनिक यंत्रणा बसवण्याची मागणी केली होती. निधी मंजूर झाल्यानंतर धामारी रोड परिसरात ही अलार्म प्रणाली बसवण्यात आली आहे.

ही प्रणाली बिबट्याची हालचाल ओळखून तत्काळ इशारा देत असल्याने नागरिकांना वेळेवर सावध होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे मानवी जीवितासह पशुधनाचे संरक्षण करण्यास मोठी मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## नागापूर बंधाऱ्यावर चोरट्यांची वक्रदृष्टी



दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील वळती-नागापूर गावाच्या हद्दीतील मीना नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यावर अज्ञात चोरट्यांनी डोळा ठेवला असून एका बाजूचे लोखंडी संरक्षक कठडे चोरीला गेल्याने वाहतूक धोकादायक बनली आहे. यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

मनुष्यवस्तीपासून दूर असलेल्या या बंधाऱ्यावर नेहमी वर्दळ नसल्याचा फायदा घेत चोरट्यांनी एक-एक करून लोखंडी पाईप काढून नेले आहेत. परिणामी, बंधाऱ्याच्या एका बाजूचे संरक्षक कठडे जवळपास पूर्णपणे नाहीसे झाले आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी तसेच पावसाळ्यात या मार्गाने ये-जा करणाऱ्या नागरिकांसाठी मोठा धोका निर्माण झाला आहे. यापूर्वीही या बंधाऱ्यावरील ढापे चोरीला जाण्याच्या घटना घडल्या होत्या. त्यानंतर जलसंपदा विभागाने काही ढापे काढून जवळच्या सुरक्षित ठिकाणी ठेवले होते. मात्र, त्या घटनेला चार ते पाच वर्षे उलटूनही ते ढापे अद्याप तसेच पडून असल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीवर जलसंपदा विभागाकडून कोणतीही ठोस उपाययोजना न झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. बंधाऱ्याची सुरक्षा वाढवून नियमित देखरेख करावी तसेच चोरी रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

### अजितदादांच्या आठवणींना कृषिमंत्री भरणे यांचा उजाळा

# मोठ्या नेत्यांना शिंगावर घेणारा नेता गमावला

दैनिक राज्य लोकतंत्र

**भवानीनगर :** "छोट्या कार्यकर्त्यांसाठी मोठ्या नेत्यांनाही शिंगावर घेणारा नेता आपण गमावला आहे. त्यांची जागा कोणीही घेऊ शकत नाही; दादा हे दादाच होते," अशा शब्दांत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला. ते भवानीनगर येथील कार्यक्रमात बोलत होते.




गजानन हगवणे व राजेंद्र हगवणे यांच्या 'सदगुरू अमृततुल्य' हॉटेल व 'सदगुरू पशु सेवा मेडिकल'चे उद्घाटन कृषिमंत्री भरणे यांच्या हस्ते पार पडले. या कार्यक्रमाला श्री छत्रपती साखर कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी माजी अध्यक्ष प्रशांत काटे, संचालक शिवाजी निंबाळकर, पृथ्वीराज घोलप, अनिल काटे, राज्य अन्न आयोगाचे सदस्य ॲड. रणजीत निंबाळकर, सचिन सपकळ, सरपंच यशवंत पाटील, विक्रम निंबाळकर, युवराज रणवरे, सतीश काटे, सागर भोईटे, मोहन सुरुडकर आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना पृथ्वीराज जाचक यांनी कारखान्याच्या कामकाजाबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की, कारखान्याच्या व्यावसायिक गाळ्यांच्या भाड्यात १५ वर्षांनंतर वाढ करण्यात आली असून त्याचा फायदा सभासदांनाच होणार आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या माध्यमातून कारखाना परिसरासाठी २९ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे.

कारखाना परिसराची नियमित स्वच्छता केली जात असून, गाळेधारकांपैकी सुमारे ८० टक्के जणांनी भाडे जमा केले आहे. गाळेधारकांनी ११ महिन्यांचा करार केल्यानंतर दीर्घकालीन व्यवसाय करता येणार असून कोणालाही बाहेर काढले जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच गाळ्यांच्या व्यवहारातील ट्रान्सफर पद्धत बंद करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

कारखान्याच्या विस्तारासाठी विशेष सर्वसाधारण सभा घेण्यात येणार असून, सभासदांचा ऊस वेळेत गेला पाहिजे, उत्पादन वाढले पाहिजे आणि कारखान्याची आर्थिक स्थिती अधिक बळकट झाली पाहिजे, यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

## खेडमध्ये शिष्यवृत्ती परीक्षा सुरळीत



दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** खेड तालुक्यात रविवारी शिष्यवृत्ती परीक्षा कोणत्याही अडचणीशिवाय सुरळीत पार पडली. तालुक्यातील एकूण ६० परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात आली, अशी माहिती गटशिक्षणाधिकारी अमोल जगंले यांनी दिली.

इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी ३६ केंद्रांवर ६,३३४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ६,००१ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित राहिले, तर ३३५ विद्यार्थी गैरहजर होते. या परीक्षेसाठी ३८ केंद्रप्रमुख आणि २६४ पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती. इयत्ता सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी २४ केंद्रांवर ४,१३१ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली होती. त्यापैकी ३,९०५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर २२६ विद्यार्थी अनुपस्थित राहिले. या परीक्षेसाठी २५ केंद्रप्रमुख आणि १७५ पर्यवेक्षक कार्यरत होते.

## सारांश वृत्त

### बंगालमध्ये ५१० कोटींपेक्षा जास्त जप्ती

**नवी दिल्ली:** पश्चिम बंगालमध्ये सोमवारी अवैध प्रलोभनांची एकूण जप्ती ५१० कोटी रुपयांपेक्षा जास्त झाली आहे, अशी माहिती निवडणूक आयोगाने दिली. २०२१ च्या मागील विधानसभा निवडणुकीदरम्यान वसूल केलेल्या ३३९ कोटी रुपयांपेक्षा ही जप्ती जास्त आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, राज्यातील २०२४ च्या लोकसभा निवडणुकांच्या तुलनेत हे प्रमाण जास्त आहे.

### ग्रेट इंडियन ट्रॅव्हल बाजार सुरू

**जयपूर** : जागतिक खरेदीदार, धोरणकर्ते आणि उद्योग क्षेत्रातील हितधारकांना एकत्र आणणाऱ्या, 'ग्रेट इंडियन ट्रॅव्हल बाजार' या इनबाउंड पर्यटन कार्यक्रमाच्या १५ व्या आवृत्तीला जयपूरमध्ये सुरुवात झाली. पर्यटन मंत्रालय, राजस्थान पर्यटन विभाग आणि फिक्की यांच्या संयुक्त विद्यमाने जयपूर प्रदर्शन आणि संमेलन केंद्र येथे तीन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. रविवारी संध्याकाळी उशिरा एका हॉटेलमध्ये झालेल्या उद्घाटन समारंभात बोलताना, उपमुख्यमंत्री दिया कुमारी म्हणाल्या की, पर्यटन हे राज्याच्या आर्थिक विकासाचे प्रमुख चालक असून, ते रोजगार आणि गुंतवणूक निर्माण करते.

### ट्रम्प हल्ल्याचा चीनकडून निषेध

**बीजिंग** : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या उपस्थितीत झालेल्या व्हाईट हाऊस कॉरस्पॉन्डंट्स डिनरमधील गोळीबाराच्या घटनेवर चीनने सोमवारी गूढ प्रतिक्रिया देत, "बेकायदेशीर हिंसाचाराचा" विरोध आणि निषेध केला आहे. शनिवारी एका बंदूकधाऱ्याने व्हाईट हाऊस कॉरस्पॉन्डंट्स डिनरवर हल्ला करण्याचा केलेला प्रयत्न, ज्याला ट्रम्प यांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न म्हटले जात आहे, त्यावर प्रतिक्रिया विचारल्यावर चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान यांनी येथे सांगितले की, “गोळीबाराची ही घटना चीनच्या निदर्शनास आली आहे. आम्ही बेकायदेशीर हिंसाचाराचा विरोध आणि निषेध करतो,” असे हल्ल्यासंदर्भातील एका प्रश्नाला दिलेल्या प्रतिक्रियेत लिन म्हणाले.

## निर्यातीला चालना, गुंतवणुकीची संधी वाढणार

# भारत–न्यूझीलंड मुक्त व्यापार करार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भारत आणि न्यूझीलंड यांनी द्विपक्षीय व्यापार व गुंतवणूक वाढवण्याच्या उद्देशाने महत्त्वपूर्ण मुक्त व्यापार करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. वाणिज्य व उद्योग मंत्री पियुष गोयल आणि न्यूझीलंडचे व्यापार व गुंतवणूक मंत्री टॉड मॅक्ले यांच्या उपस्थितीत हा करार अंतिम करण्यात आला. या करारामुळे दोन्ही देशांमधील आर्थिक संबंधांना नवे बळ मिळणार आहे.




या कराराचा सर्वात मोठा फायदा म्हणजे भारतातून न्यूझीलंडला होणाऱ्या १०० टक्के निर्यातीला शुल्कमुक्त प्रवेश मिळणार आहे. सर्व टॅरिफ लाईन्सचा समावेश असल्याने भारतीय उत्पादकांना न्यूझीलंडच्या बाजारपेठेत अधिक स्पर्धात्मक संधी मिळतील. विशेषतः वस्त्रोद्योग, तयार कपडे, चामड्याच्या वस्तू, पादत्राणे, रत्ने-दागिने, अभियांत्रिकी उत्पादने आणि प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ या श्रमकेंद्रित क्षेत्रांना मोठा फायदा होण्याची अपेक्षा आहे. यामुळे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना चालना मिळून रोजगारनिर्मिती वाढेल. यापूर्वी न्यूझीलंडकडून सिरॅमिक्स, कार्पेट, ऑटोमोबाईल्स आणि ऑटो पार्ट्स यांसारख्या भारतीय उत्पादनांवर १० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क आकारले जात होते. आता हे शुल्क हटवल्याने भारतीय उत्पादनांना समान संधी मिळणार असून निर्यात वाढीस मदत होईल.

भारतालाही या करारातून कच्च्या मालाच्या आयातीवर फायदा मिळणार आहे. लाकडी ओंडके, कोकिंग कोळसा, धातूंचा कचरा आणि भंगार यांसारख्या उत्पादनांवर शुल्कमुक्त प्रवेश मिळाल्याने उत्पादन खर्च कमी होऊन उद्योगांची जागतिक स्पर्धात्मकता वाढेल.

भारताने आपल्या संवेदनशील क्षेत्रांचे संरक्षण करत संतुलित भूमिका घेतली आहे. एकूण २९.९७ टक्के टॅरिफ लाईन्स वगळण्यात आल्या असून उर्वरित ७०.०३ टॅरिफ लाईन्सवर टप्प्याटप्प्याने शुल्क कमी करण्याचा प्रस्ताव आहे. यात ३ ते १० वर्षांच्या कालावधीत शुल्क कमी करण्याची तरतूद आहे. पेट्रोलियम उत्पादने, वनस्पती तेल, यांत्रिक व विद्युत यंत्रसामग्री यांचा यात समावेश आहे.

दुग्धजन्य पदार्थ, काही कृषी उत्पादने, साखर, तेलबिया, तसेच काही धातू आणि शस्त्रास्त्रे यांसारख्या संवेदनशील क्षेत्रांना या करारातून वगळण्यात आले आहे, ज्यामुळे देशांतर्गत उद्योगांचे संरक्षण सुनिश्चित करण्यात आले आहे.

न्यूझीलंडच्या काही उत्पादनांना भारतीय बाजारपेठेत प्रवेश सुलभ होणार आहे. वाइन, औषधे, पॉलिमर, लोखंड-पोलाद उत्पादने तसेच मर्यादित प्रमाणात मॅन्युका मध, सफरचंद आणि किवी फळांना शुल्कसवलती मिळणार आहेत. या करारामध्ये भारतात २० अब्ज अमेरिकी डॉलर्सची गुंतवणूक आकर्षित करण्याची तरतूदही आहे. गुंतवणूक अपेक्षेप्रमाणे न झाल्यास त्यासाठी पुनर्संतुलन यंत्रणा ठेवण्यात आली आहे, ज्यामुळे कराराचे आर्थिक उद्दिष्ट साध्य होईल. २०२४ मध्ये भारत-न्यूझीलंड यांच्यातील वस्तू व सेवांचा एकूण व्यापार २.४ अब्ज अमेरिकी डॉलर्स इतका होता. नव्या करारामुळे हा आकडा लक्षणीय वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## होर्मुझ उघडण्यासाठी इराणचा नवा प्रस्ताव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तेहरान** : प्रादेशिक तणाव कमी करण्याच्या उद्देशाने इराणने पाकिस्तानमार्फत अमेरिकाला एक नवा राजनैतिक प्रस्ताव दिला आहे. या प्रस्तावात होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा खुली करणे आणि संघर्ष संपवण्यासाठी टप्प्याटप्प्याने उपाययोजना सुचवण्यात आल्या आहेत.

'ॲक्सिऑस'नुसार, या आराखड्यात प्रथम सामुद्रधुनीवरील तणाव कमी करणे आणि अमेरिकेने लादलेली सागरी नाकेबंदी हटवणे यावर भर देण्यात आला आहे. त्यानंतरच अणुविषयक वाटाघाटी पुढील टप्प्यात घेण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. या प्रस्तावानुसार, दोन्ही बाजूंमध्ये दीर्घकालीन युद्धविराम लागू केला जाईल किंवा संघर्ष कायमस्वरूपी संपवण्याबाबत सहमती साधली जाईल. होर्मुझ सामुद्रधुनी खुली झाल्यानंतर आणि नाकेबंदी हटवल्यानंतरच अणु चर्चेला सुरुवात करण्याची अट इराणने ठेवली आहे.

हा प्रस्ताव व्हाइट हाऊसपर्यंत पोहोचल्याची माहिती असून, अमेरिकेकडून त्यावर सकारात्मक प्रतिसाद दिला जाईल का, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी वाटाघाटींसाठी इराणने पुढाकार घ्यावा, असे म्हटले असले तरी इराणने अण्वस्त्रे विकसित करू नयेत, या भूमिकेवर ते ठाम आहेत. इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची हे सध्या पाकिस्तान आणि ओमान यांच्यामार्फत मध्यस्थी करत असून पुढील चर्चेसाठी ते रशियामध्ये पुतिन यांची भेट घेणार आहेत.

२८ फेब्रुवारी रोजी झालेल्या अमेरिका-इस्रायल लष्करी कारवाईनंतर मोठ्या प्रमाणातील लढाई कमी झाली असली तरी औपचारिक शांतता करार अद्याप झालेला नाही. या संघर्षामुळे मोठी जीवितहानी झाली असून जागतिक अर्थव्यवस्थेवरही त्याचा परिणाम होत आहे. जागतिक तेलवाहतुकीपैकी सुमारे २० टक्के वाहतूक होर्मुझ सामुद्रधुनीतून होत असल्याने या भागाला प्रचंड सामरिक महत्त्व आहे.

## दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : आंतरराज्यीय दहशतवादी कारवायांशी संबंधित मोठ्या प्रकरणात राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए) ने तपास हाती घेतला असून, अटक केलेल्या पाच दहशतवाद्यांना सोमवारी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. यामध्ये दोन पाकिस्तानी नागरिकांचाही समावेश असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

हे प्रकरण ७ एप्रिल रोजी जम्मू आणि काश्मीर पोलीस यांनी राबवलेल्या दहशतवादविरोधी मोहिमेशी संबंधित आहे. या कारवाईत लष्कर-ए-तोयबा या संघटनेच्या पाच कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली होती.



अटक आरोपींमध्ये अब्दुल्ला उर्फ अबू हुरैरा याचा समावेश असून तो तब्बल १६ वर्षांपासून फरार होता. त्याने केंद्रशासित प्रदेशाबाहेरही आपले जाळे निर्माण केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. याशिवाय उस्मान उर्फ खुबैब हा दुसरा पाकिस्तानी दहशतवादी आणि श्रीनगरमधील मोहम्मद नकीब भट, आदिल रशीद व गुलाम मोहम्मद मीर उर्फ मामा यांनाही अटक करण्यात आली आहे. प्राथमिक तपासात दहशतवाद्यांना रसद आणि आर्थिक मदत पुरवणारे एक व्यापक नेटवर्क उघड झाल्याचे समोर आले आहे. या नेटवर्कचे इतर दुवे शोधण्यासाठी तपास यंत्रणा सखोल चौकशी करत आहेत. पुढील तपासासाठी एनआयएने हे प्रकरण आपल्या ताब्यात घेतले असून, सर्व आरोपींना विशेष न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने दोन पाकिस्तानी आरोपींना दोन दिवसांची पोलीस कोठडी, तर उर्वरित तीन स्थानिक आरोपींना १५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

## ते सात खासदार अधिकृतपणे भाजपमध्ये!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : राज्यसभेत मोठ्या घडामोडीत आम आदमी पक्षाचे (आप) सात खासदार भारतीय जनता पक्षात (भाजप) विलीन झाल्याची नोंद सभापती सी. पी. राधाकृष्णन यांनी औपचारिकपणे स्वीकारली आहे. सोमवारी जाहीर झालेल्या या निर्णयामुळे राज्यसभेतील 'आप'चे संख्याबळ १० वरून थेट ३ वर आले असून भाजपची ताकद ११३ सदस्यांपर्यंत पोहोचली आहे.

या पक्षांतराचे नेतृत्व राघव चड्ढा, संदीप पाठक आणि अशोक मित्तल यांनी केल्याचे सांगितले जात आहे. त्यांच्या सोबत हरभजन सिंग, स्वाती मालीवाल, विक्रमजीत सिंग सहानी आणि राजिंदर गुप्ता यांचाही समावेश आहे. या सर्वांनी भाजप अध्यक्ष नितीन नवीन यांची भेट घेऊन प्रवेशाची औपचारिकता पूर्ण केली. या खासदारांनी पक्षात 'कोंडमारा' होत असल्याचा आरोप करत तसेच भ्रष्टाचारविरोधी मूळ तत्त्वांपासून पक्ष दूर गेल्याचे कारण देत हा निर्णय घेतल्याचे सांगितले. सात सदस्यांचा गट असल्याने त्यांनी घटनादुरुस्तीतील दहाव्या अनुसूचीतील दोन-तृतीयांश अट पूर्ण केल्याचा दावा केला आहे, ज्यामुळे पक्षांतरबंदी कायद्याखाली अपात्रता टाळण्याचा प्रयत्न दिसतो.

दरम्यान, आम आदमी पक्षाने या निर्णयाला तीव्र विरोध करत सर्व सात खासदारांना अपात्र ठरवण्याची मागणी करणारी याचिका सभापतींकडे दाखल केली आहे. पक्षाचे नेते संजय सिंह यांनी या विलीनीकरणाला “घटनात्मक फसवणूक” आणि “पंजाबच्या जनादेशाचा विश्वासघात” असे संबोधले. तसेच भाजपकडून केंद्रीय यंत्रणांचा दबाव वापरल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

'आप'चे म्हणणे आहे की, मूळ राजकीय पक्षाच्या संमतीशिवाय केवळ विधानमंडळातील गटाने केलेले विलीनीकरण वैध ठरू शकत नाही. त्यामुळे हा निर्णय सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याची तयारी पक्षाने दर्शवली आहे. या घडामोडीमुळे राज्यसभेतील राजकीय समीकरणात मोठा बदल झाला आहे. २४५ सदस्यांच्या सभागृहात भाजप ११३ जागांसह अधिक बळकट झाला असून एनडीएची ताकद १४१ वर पोहोचली आहे. त्यामुळे केंद्र सरकार बहुमताच्या जवळ पोहोचले आहे. 'आप'साठी हा मोठा धक्का मानला जात असून राज्यसभेत संजय सिंह, एन. डी. गुप्ता आणि बलबीर सिंग सीचेवाल हेच सदस्य उरले आहेत.

दरम्यान, पंजाबमधील आमदारांवरही लक्ष ठेवले जात असून पक्ष संघटना टिकवण्यासाठी बैठका आणि समन्वय वाढवण्यात आला आहे.

## शोपियानमधील मदरशावर मोठी कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर** : जम्मू-काश्मीर प्रशासनाने मोठा निर्णय घेत दक्षिण काश्मीरमधील शोपियान जिल्ह्यातील दारुल उलूम जामिया सिराज-उल-उलूम या मदरशाला बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) कायदा १९६७ अंतर्गत “बेकायदेशीर संस्था” घोषित केले आहे. बंदी घातलेल्या जमात-ए-इस्लामीशी कथित संबंध आणि विविध अनियमिततांच्या आरोपांमुळे ही कारवाई करण्यात आली आहे.

विभागीय आयुक्त अंशुल गर्ग यांनी दिलेल्या आदेशानुसार, या संस्थेविरुद्ध शोपियान पोलिसांनी सादर केलेल्या अहवालात अनेक गंभीर बाबी समोर आल्या आहेत. धार्मिक शिक्षण देणारी संस्था म्हणून काम करत असली, तरी तिच्या कारभारात कायदेशीर आणि आर्थिक अनियमितता आढळल्याचे नमूद करण्यात आले आहे. जमीन खरेदीतील संशयास्पद व्यवहार, आवश्यक नोंदणीचा अभाव आणि शासकीय नियंत्रण टाळण्याचे प्रयत्न यावर विशेष उल्लेख करण्यात आला आहे. या मदरशाचे जमात-ए-इस्लामी या बंदी घातलेल्या संघटनेशी संबंध असल्याचा दावा करण्यात आला आहे. संस्थेच्या व्यवस्थापनात या संघटनेशी संबंधित व्यक्तींचा प्रभाव असल्याचेही अहवालात नमूद आहे.

प्रशासनाच्या मते, संस्थेच्या आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकतेचा अभाव असून निधीच्या गैरवापराची शक्यता आहे. काही माजी विद्यार्थी दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी झाल्याचेही निदर्शनास आले असून, त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने ही कारवाई आवश्यक ठरल्याचे सांगण्यात आले. आता प्रशासनाला संबंधित ठिकाण सील करणे, मालमत्ता गोठवणे यासारखी पावले उचलता येतील. या प्रकरणातही पुढील कारवाईची शक्यता आहे.

## जाहीर सभेत पंतप्रधान मोदींचा आत्मविश्वास

# बंगालमध्ये भाजपचा विजयाचा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बॅरकपूर येथे 'विजय संकल्प' सभेत जोरदार प्रचार करत भाजपच्या विजयाचा ठाम विश्वास व्यक्त केला. ४ मे रोजी निकाल लागल्यानंतर भाजपचा शपथविधी होईल, असा दावा त्यांनी यावेळी केला.

सभेला संबोधित करताना मोदींनी बंगालशी असलेले आपले भावनिक आणि आध्यात्मिक नाते अधोरेखित केले. “बंगालशी माझे नाते हे शक्तीभक्तीचे आहे. माझ्या आध्यात्मिक प्रवासाला या भूमीने ऊर्जा दिली आहे. येथे मिळालेले प्रेम आणि आशीर्वाद मी आयुष्यभर जपेन,” असे ते म्हणाले.

ही निवडणूक प्रचारातील आपली शेवटची सभा असल्याचे सांगत त्यांनी राज्यातील जनतेचा कल भाजपकडे असल्याचा दावा केला. “मी जिथे जिथे गेलो, तिथे लोकांचा मूड स्पष्ट दिसतो. निकालानंतर शपथविधीसाठी मला पुन्हा यावे लागेल,” असे त्यांनी सांगितले.



प्रचारादरम्यान नागरिकांकडून मिळालेल्या प्रतिसादाबद्दल बोलताना मोदी म्हणाले की, लोकांनी दिलेली पत्रे, चित्रे आणि संदेश ते स्वतः वेळ काढून पाहतात. “त्या संदेशांतून कधी वेदना, तर कधी आशीर्वाद जाणवतो,” असे त्यांनी नमूद केले.

आपल्या राजकीय प्रवासाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, गेली अनेक दशके ते देशभर फिरत पक्ष कार्यकर्ता म्हणून काम करत आहेत. “घर सोडल्यानंतर मला देशातील जनता हाच माझा परिवार वाटतो,” असे त्यांनी भावनिक शब्दांत सांगितले. यावेळी त्यांनी कायदा-सुव्यवस्था, घुसखोरी आणि नागरिकत्वाच्या मुद्द्यांवरही भाष्य केले. “भाजप सरकारमध्ये कोणावरही जात-धर्माच्या आधारावर अन्याय होणार नाही. मात्र बांगलादेशी घुसखोरांवर कठोर कारवाई केली जाईल. मतुआ समाजाला नागरिकत्व दिले जाईल,” असे आश्वासन त्यांनी दिले. तसेच तृणमूल काँग्रेसवर टीका करत “टीएमसी सरकारने जनतेच्या मतांचा आदर केला नाही,” असा आरोपही त्यांनी केला. “मतदान करताना मागील अत्याचार लक्षात ठेवा आणि बंगालमध्ये भाजप सरकार स्थापन करा,” असे आवाहन त्यांनी केले.

या मतदारसंघात भाजपकडून कौस्तव बागची तर तृणमूल काँग्रेसकडून राज चक्रवर्ती रिंगणात आहेत. सीपीआय(एम)चे उमेदवार सुमन रंजन बंडोपाध्याय यांनी दोन्ही प्रमुख पक्षांवर टीका केली आहे. दुसऱ्या टप्प्याचे मतदान २९ एप्रिल रोजी होणार असून मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे.

## महिला वकिलावरील हल्ल्याची सर्वोच्च दखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पतीने एका महिला वकिलावर केलेल्या कथित चाकू हल्ल्याची स्वतःहून दखल घेत, सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी अनेक निर्देश जारी केले. या क्रूर हल्ल्यानंतर पीडितेची प्रकृती चिंताजनक असल्याचेही न्यायालयाने नमूद केले. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या अध्यक्षतेखालील सर्वोच्च न्यायालयाच्या दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने दिल्ली पोलीस आयुक्तांना हा तपास एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडे, शक्यतो एसीपी किंवा डीसीपी दर्जाच्या महिला अधिकाऱ्याकडे सोपवण्याचे निर्देश दिले आहेत.

पत्रासोबत काही छायाचित्रे जोडली होती, ज्यात महिला वकीलवर धारदार शस्त्राने क्रूर हल्ला झाल्याचे दिसत होते आणि त्यात त्या अनेक गंभीर जखमी झाल्या होत्या. छायाचित्रांमधील पीडितेची अवस्था आणि तिच्यावर एम्स ट्रॉमा सेंटरमध्ये उपचार सुरू असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेऊन, आम्ही स्वतःहून खटला दाखल केला”, असे न्यायालयाने नमूद केले आणि स्वतःहून दखल घेतलेल्या खटल्याची सुनावणी पुन्हा सुरू केली. पीडितेला गुरु तेग बहादूर रुग्णालय, कैलाश दीपक रुग्णालय आणि आरके रुग्णालय यांसह अनेक रुग्णालयांमध्ये दाखल करून घेण्यास नकार देण्यात आला होता, हे युक्तिवाद लक्षात घेऊन, न्यायालयाने असा आरोप नोंदवला की तिला दुसरीकडे पाठवण्यापूर्वी केवळ प्राथमिक प्रथमोपचार देण्यात आले होते. खंडपीठाने वैद्यकीय उपचार नाकारल्याच्या आरोपावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत विचारले, “या रुग्णालयांनी पीडितेला वैद्यकीय उपचार का नाकारले?” तीन रुग्णालयांनी पीडितेला दाखल करून घेण्यास आणि उपचार करण्यास दिलेल्या कथित नकाराची चौकशी करण्याचे निर्देशही खंडपीठाने तपास अधिकाऱ्याला दिले. दिल्लीत वकिली करणाऱ्या एका महिला वकिलावर काल रात्री तिच्या पतीने तलवारीने हल्ला केल्याचे वृत्त आहे.

सोमवारी झालेल्या सुनावणीदरम्यान, पोलिसांच्या वतीने हजर असलेल्या अतिरिक्त सॉलिसिटर जनरल (एएसजी) ऐश्वर्या भाटी यांनी सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

## केरळ हजची तयारी पूर्ण

**मलप्पुरम (केरळ)** : केरळमधील तिन्ही इमर्बकेशन पॉइंट्सवर यावर्षीच्या हज शिबिरांची व्यवस्था पूर्ण झाली आहे, असे राज्य हज समितीचे अध्यक्ष हुसेन सकाफी चुल्लीकोडे यांनी सोमवारी सांगितले. राज्यातून पहिले हज विमान ३० एप्रिल रोजी कोचीहून निघेल, तर हज शिबिराचे उद्घाटन २९ एप्रिल रोजी कोची येथे होणार आहे, असे त्यांनी येथे एका पत्रकार परिषदेत सांगितले. मागील वर्षाप्रमाणेच, कोची, कोझिकोड आणि कन्नूर ही प्रस्थान बिंदू म्हणून निश्चित करण्यात आली आहेत.

## व्ह-इन संबंध तोडणे गुन्हा नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : लिव्ह-इन रिलेशनशिपमधून बाहेर पडणे हे स्वतःहून कोणतेही फौजदारी कृत्य ठरत नाही, असे स्पष्ट निरीक्षण सर्वोच्च न्यायालय यांनी नोंदवले आहे. न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना यांच्या खंडपीठासमोर दाखल याचिकेवरील सुनावणीदरम्यान हे मत व्यक्त करण्यात आले.

लग्नाचे खोटे आश्वासन देत बलात्कार आणि मारहाणीचा आरोप करणाऱ्या महिलेच्या प्रकरणावर सुनावणी करताना न्यायालयाने महत्त्वाची भूमिका स्पष्ट केली. प्रौढ व्यक्तींनी परस्पर संमतीने एकत्र राहण्याचा निर्णय घेतला असेल, तर त्या नात्याचे स्वरूप आणि त्यातील जोखीम वेगळ्या प्रकारे पाहावे लागते, असे न्यायालयाने नमूद केले.

न्यायमूर्ती नागरत्ना यांनी विचारले की, लग्नाआधीच एकत्र राहणे आणि मुलाला जन्म देणे हा निर्णय महिलेने का घेतला? तसेच, संमतीने सुरू असलेल्या नात्यात नंतर लैंगिक शोषणाचे आरोप कसे लावले जाऊ शकतात, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. विवाहाशिवाय एकत्र राहणाऱ्या नात्यांमध्ये काही अंगभूत अनिश्चितता आणि जोखीम असते. अनेक वेळा दीर्घकाळ एकत्र राहिल्यानंतर नाते तुटते आणि त्यानंतर वाद निर्माण होतात. मात्र, नाते संपल्यामुळे गुन्हा ठरत नाही, हे स्पष्ट करण्यात आले. नाते वैध नसले तरी त्या मुलाला 'अवैध' म्हणता येणार नाही. तसेच, महिलेला मुलासाठी पोटगी मागण्याचा अधिकार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

## जागतिक लष्करी खर्चात सलग ११व्या वर्षी वाढ

# भारताच्या संरक्षण खर्चात वाढ; जगात पाचव्या क्रमांकावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : जागतिक सुरक्षेच्या बदलत्या समीकरणांच्या पार्श्वभूमीवर २०२५ मध्ये लष्करी खर्चात लक्षणीय वाढ नोंदवली गेली आहे. स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूटच्या अहवालानुसार, भारताने आपला संरक्षण अर्थसंकल्प ८.९ टक्क्यांनी वाढवून ९२.१ अब्ज डॉलरवर नेला असून, तो जगातील पाचवा सर्वाधिक लष्करी खर्च करणारा देश ठरला आहे.

अहवालानुसार, २०२५ मध्ये जागतिक लष्करी खर्च २.८८७ ट्रिलियन अमेरिकी डॉलरपर्यंत पोहोचला आहे. हा सलग ११वा वर्ष आहे की, जागतिक स्तरावर संरक्षण खर्चात वाढ झाली आहे. सर्वाधिक खर्च करणाऱ्या देशांमध्ये अमेरिका, चीन, रशिया, जर्मनी आणि भारत यांचा समावेश असून, या पाच देशांचा एकत्रित वाटा ५८ टक्के (१.६८६ ट्रिलियन डॉलर) इतका आहे.




मे २०२५ मध्ये झालेल्या भारत-पाकिस्तानमधील मर्यादित संघर्षामुळे दक्षिण आशियात संरक्षण खर्चात वाढ झाली. या संघर्षात लढाऊ विमाने, ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वापर झाला. यानंतर पाकिस्तानने चीनकडून शस्त्रास्त्र खरेदी वाढवली असून, त्यांचा लष्करी खर्च ११ टक्क्यांनी वाढून ११.९ अब्ज डॉलरवर गेला आहे.

जागतिक स्तरावर संरक्षणासाठी खर्च होणारा जीडीपीमधील वाटा (लष्करी भार) २०२४ मधील २.४ टक्क्यांवरून २०२५ मध्ये २.५ टक्क्यांवर पोहोचला, जो २००९ नंतरचा उच्चांक आहे. दरडोई लष्करी खर्च ३५२ डॉलरपर्यंत वाढला असून, सरकारी खर्चातील सरासरी वाटा ६.९ टक्के राहिला आहे.

युरोपमध्ये लष्करी खर्चात १४ टक्क्यांची वाढ होऊन तो ८६४ अब्ज डॉलरवर पोहोचला आहे. शीतयुद्धानंतरची ही सर्वात मोठी वाढ मानली जात आहे. नाटो देशांचे पुनःशस्त्रीकरण आणि युक्रेनमधील सुरू असलेला संघर्ष ही या वाढीमागील प्रमुख कारणे आहेत. रशिया आणि युक्रेन या दोन्ही देशांनी युद्धाच्या चौथ्या वर्षात संरक्षण खर्च वाढवला आहे. याउलट, अमेरिकेचा लष्करी खर्च ७.५ टक्क्यांनी घटून ९५४ अब्ज डॉलरवर आला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे युक्रेनसाठी नव्या लष्करी मदत पॅकेजेसचा अभाव, असे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

आशिया आणि ओशिनिया प्रदेशात लष्करी खर्चात ८.१ टक्क्यांची वाढ होऊन तो ६८१ अब्ज डॉलरवर पोहोचला आहे. चीन ने ७.४ टक्क्यांची वाढ करत आपला संरक्षण खर्च ३३६ अब्ज डॉलरवर नेला आहे. चीनने सलग ३१ वर्षे संरक्षण खर्चात वाढ कायम ठेवली आहे. सततच्या संघर्ष आणि तणाव असूनही पश्चिम आशियामध्ये तुलनेने किरकोळ वाढ नोंदवली गेली आहे.

निष्कर्षानुसार, दीर्घकाळ चाललेली भू-राजकीय अस्थिरता, प्रादेशिक संघर्ष आणि सुरक्षेच्या वाढत्या गरजा यामुळे २०२५ मध्ये जागतिक लष्करी खर्चात जवळपास ३ टक्क्यांची वाढ झाली. युरोप आणि आशिया या प्रदेशांतील वाढत्या संरक्षण गुंतवणुकीमुळे ही वाढ अधिक ठळकपणे दिसून आली.